ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख २९ एप्रिल, १९५३ अंक १७

## विविध माहिती

**राज्य सरकारांना भारत सरकारचीं कर्जें**—भारत सरकारनें राज्य सरकारांना वेळोवेळ दिलेल्या कर्जांची एकूण रकम ३१ मार्च, १९५२ अखेर ३४० कोटी रु. झाली आहे. वेगवेगळ्या ६०० प्रकरणांवर ही रकम विभागलेली आहे. व्याजाचा दर मुदतीप्रमाणें वेगवेगळा आहे; सर्वांत ज्यास्त दर ४३% आहे.

**नॅशनल सेव्हिंग्ज बँक लि.**—वरील बँकेचें नांव रिझर्व्ह बँकेनें शेड्यूल्ड बँकांच्या यादींतून वगळलें व त्यामुळें तिच्या क्लिअरिंग हाऊसच्या सोई थांबल्या. बँकेनें मंगळवार ता. २१ पासून पैसे देण्याचे व्यवहार बंद केले. १९४१ मध्यें स्थापन झालेल्या ह्या बँकेचें १९५१ अखेरचे आकडे खालीलप्रमाणें होतेः—वसूल भांडवल ४५·९९ लक्ष रु., रिझर्व्ह व इतर फंड २·३७ लक्ष रुपये, ठेवी ८७·४६ लक्ष रुपये, कर्जें ५९·६६ लक्ष रुपये. बँकेनें मुंबई हायकोर्टांत अर्ज करून ‘ मॉरेटोरियम ’ मिळविला आहे; म्हणजे कांहीं काळ बँके-विरुद्ध कोणतेंहि प्रकरण चालवितां येणार नाहीं.

**हुबळी येथें विमानतळ होत नाहीं**— हुबळी येथें तूर्त विमानतळ करण्यांत येणार नाहीं; कारण पंचवार्षिक योजनेंत त्याचा समावेश करतां येण्याजोगी आर्थिक परिस्थिति नाहीं, असें अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे.

**कापडाचें व सुताचें उत्पादन सुधारलें**— भारतांतील गिरण्यांनीं १९५३ च्या पहिल्या तिमाहींत १२०·१ कोटी वार कापड व ३६·४ कोटी पौंड सूत उत्पादन केलें. १९५२ च्या पहिल्या तिमाहींतील उत्पादन १०२·९ कोटी वार कापड व ३३·६ कोटी पौंड सूत, असें होतें.

**पाण्याच्या मीटर्सचें उत्पादन**—उत्तर-प्रदेश सरकारच्या लखनौ येथील कारखान्यांत पाण्याच्या मीटर्सचें उत्पादन वाढत आहे. आठ जर्मन तज्ज्ञांच्या साहाय्यानें हा कारखाना १९५० मध्यें सुरू करण्यांत आला. तेव्हांपासून आतांपर्यंत ३,००० मीटर्सचें उत्पादन करण्यांत आलें आहे. चालू वर्षी १०,००० मीटर्स व ५०० मायक्रॉस्कोप्स तयार करण्याचा कार्यक्रम कारखान्यानें आखला आहे.

**“ अधिक शेपट्या आणा ” मोहीम**— मध्य प्रदेश सरकारनें, मारलेल्या वानरांच्या प्रत्येक शेपटीस १ रु. बक्षीस जाहीर केलें आहे. किमान २० शेपट्या एका वेळीं दिल्या तरच बक्षीस मिळूं शकेल. राज्य सरकारनें बक्षिसासाठीं १४,००० रु. ची तरतूद केली आहे, त्यांपैकीं ८०% एवढी रकम अमरावती जिल्ह्यासाठीं आहे.

**महाराष्ट्र परिचय व्याख्यानमाला**—आपण महाराष्ट्रांत राहतों तो महाराष्ट्र कसा निर्माण झाला, त्याची वाढ कशी झाली, महाराष्ट्राचीं वैशिष्ट्यें काय आहेत, त्यांत पिकें कोणतीं होतात, त्यांत उद्योगधंदे कोणते आहेत, याची यथातथ्य कल्पना यावी यासाठीं महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालया-मार्फत कॉमन्वेल्थ सभागृहांत गुरुवार ता. ३० एप्रिल, १९५३ पासून व्याख्यानमाला सुरू करण्यांत येणार आहे. या मालेंत महाराष्ट्राचा अभ्यास केलेल्या व्यक्तींचीं सुमारें ३० व्याख्यानें होणार आहेत.

**शिक्षणप्रसारासाठीं सहकारी सोसायटी**—व्यवसायिक व यांत्रिक शिक्षणाच्या शाळा-कॉलेजें चालविण्यासाठीं मदुरा येथें एक सहकारी सोसायटी स्थापण्यांत येणार आहे. मदुरा सें. को. बँकेमध्यें सहकारी कार्यकर्त्यांची एक सभा बोलाविण्यांत आली होती, तिनें हा निर्णय घेतला. को ऑपरेटिव्ह सोसायट्यांचे रजिस्ट्रार सभेस उपस्थित होते व त्यांनीं अशा सोसायटीची उपयुक्तता विशद केली.

**कंपन्यांच्या डायरेक्टरांस उपयुक्त पुस्तक**—“ कंपनी डायरेक्टर, त्यांचीं कामें, अधिकार व कर्तव्यें ” ह्या नांवाचें पुस्तक इन्स्टिट्यूट ऑफ डायरेक्टर्सच्या संमतीनें मि. आल्फ्रेड रीड ह्यांनीं तयार केलें आहे. तें जॉर्डन आणि सन्स ह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. पुस्तकाची पृष्ठसंख्या २२९ असून किंमत ३० शिलिंग आहे. मि. ऑलिव्हर लिटलटन हे उपोद्घातांत म्हणतात, “ डायरेक्टरांच्या उपयोगी पडणारें हें पुस्तक प्रत्येक सुबुद्ध डायरेक्टरानें अवश्य संग्रहीं ठेवावें.”

**३% १९५३–५४ च्या कर्जाची परतफेड**—३ टक्के दराचें १९५३–५४ चें ( चवथें संरक्षणकर्ज ) सर्व कर्ज १५ जुलै १९५३ रोजीं त्या दिवसापर्यंतच्या व्याजासुद्धां फेड करण्यांत येईल. १५ जुलै, १९५३ पासून व नंतर त्या कर्जावर व्याज दिलें जाणार नाहीं.

**चीनचा पेट्रोलसाठीं शोध**—वायव्य चीनमध्यें पेट्रोलच्या खाणी शोधून काढण्यासाठीं मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्यांत येत आहेत. ह्या भागांत तेल सांपडणारे खडक असून त्यांचा विस्तार २३,००० चौरस मैलांवर पसरला आहे. भूगर्भशास्त्रज्ञांचीं ५२ पथकें पेट्रोलच्या शोधार्थ ह्या भागांत फसून संशोधन करीत आहेत.

**रिझर्व्ह बँकेच्या शाखा**—रिझर्व्ह बँक लवकरच बंगलोर, नागपूर व पाटणा येथें शाखा उघडणार आहे.

### बँकनोटस् धुवून वाळत घालणारी स्त्री

आरोग्य म्हणजेच संपत्ति अशा अर्थाची एक इंग्लिश म्हण प्रसिद्धच आहे. संपत्ति कशाला म्हणावें ह्या अर्थशास्त्रांतील मूलभूत आणि प्राथमिक प्रश्नाला उत्तर म्हणून वरील म्हण फारशी उपयोगी पडण्यासारखी नाहीं. उलटपक्षीं, संपत्तीचा एक प्रकार जो बँकनोट्स तो मात्र आरोग्याला घातक होऊं शकतो. पॅरिसमधील बँकांच्या अधिकाऱ्यांना बँकनोट्सवर असणाऱ्या रोगकारक जंतूंमुळें मोठी चिंता लागली असल्याचें समजतें. ५० फ्रँकच्या नोटेवर सुमारे ५०,००० जंतू असतात असें तज्ज्ञांचें मत आहे. ५०० फ्रँकच्या नोटेचा हातबदला कमी वेळां होत असला तरी तीवरहि ४०,००० रोगजंतू असावेत असा अंदाज त्यांनीं केला आहे. १,००० फ्रँकची नोट त्याहीपेक्षा कमी हातबदला करते. तरीपण तीवरहि २५,००० रोगजंतू असतात. सार्वजनिक आरोग्याची दक्षता घेणाऱ्या अधिकाऱ्यांचें ह्या प्रश्नाकडे आतां लक्ष वेधलें आहे. त्यांच्या मतानें कमी किंमतीचीं नाणीं नोटाऐवजीं चलनांत ठेवावीं. कारण नाण्यांवर रोगजंतू फारच कमी असतात. अर्थातच सार्वजनिक आरोग्याला त्यांच्यापासून कमी धोका असतो. पॅरिसमध्यें आलेल्या एका अमेरिकन स्त्रीनें नोटांवरील रोगजंतूची हकीकत वाचतांच धसका घेतला. आपल्यापुरती खबरदारी म्हणून तिनें बँकनोट्स फार दक्षतेनें वापरण्यास सुरवात केली. ही स्त्री संध्याकाळीं घरीं परत आली कीं पदरीं आलेल्या बँकनोट्स पेट्रोलनें धुवून काढी आणि आपल्या खिडकीबाहेर त्या वाळत ठेवी. ही कल्पना अर्थात्च अद्भुत आहे. पण हा उपद्व्याप थोड्या बँकनोटस् असतील तरच करणें शक्य होईल. बँकांतून अशा नोटस् शेंकड्यांनीं येणार व जाणार. त्या ठिकाणीं काय करणार हा प्रश्नच आहे.


---

### ऑस्ट्रेलिआंत घराची टंचाई

गेल्या महायुद्धांत इतर देशांप्रमाणेंच ऑस्ट्रेलिआंतहि नवीं घरें बांधण्याचें काम पूर्णपणें थांबलें. युद्ध संपल्यानंतर घरांची टंचाई दूर करण्यासाठी ऑस्ट्रेलिआंत प्रयत्न सुरू झाले. घरांना लागणारें सामान पुरविणें आणि पैसा पुरविणें असे दोन मुख्य प्रश्न ह्या कामीं उत्पन्न झाले. बांधकामाला लागणाऱ्या सामानाचा पुरवठा आतां मागणीपेक्षा अधिक होऊं लागला आहे. विटा, कौलें, सिमेंट, लाकूड, इत्यादींचा पुरवठा चांगला होऊं लागला आहे, पण पैशाचा प्रश्न मात्र नवीं घरें शोधणाऱ्या तरुण जोडप्यांना बराच त्रास देत आहे. मेलबोर्न येथील यंग कॅथॉलिक ॲक्शन ग्रुप ह्या संघटनेनें सहकारी संस्थेच्या कायद्याच्या कक्षेंत राहून ही अडचण सोडविण्याचा प्रयत्न चालविला आहे. हा प्रयत्न बराच उद्बोधक असून यशस्वीहि होत आहे असें दिसतें. वरील संस्थेंत १४ ते २५ वर्षांचे तरुण कॅथालिक लोक आहेत. सहकारी प्रयत्नांनीं घरें बांधण्याविषयीं त्यांनीं पूर्वीपासून बराच प्रचार केला आहे. कारण त्यांच्या मतानें स्थिर आणि सुखी गृहजीवनासाठी घराची फार आवश्यकता आहे. प्रथम ह्या तरुण मंडळींनीं सिक्युरिटी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी नांवाची संस्था काढली. ह्या संस्थेंतूनच पुढें बांधकाम करणाऱ्या अशा १२ संस्था निर्माण झाल्या. त्या सर्वांचे मिळून सभासद सुमारे २,००० आहेत. मुख्य म्हणजे पहिल्या संस्थेनें बँकांकडून ३.२ कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट मिळविला असून त्यासंबंधीं योग्य ती हमी दिली आहे. वरील बँकेशिवाय दि स्टेट सेव्हिंग्ज बँक ऑफ व्हिक्टोरिआ आणि इतर दोन व्यापारी बँका ह्यांच्याकडून रक्कम मिळविण्यांत आली आहे. सहकारी संस्थेचें सभासदत्व सर्व वयाच्या व सर्व धर्मांच्या सभासदांना खुलें आहे.


SAVE to help yourself and the NATION

WITH THE



HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches:* Dadar, Mahim, Poona & Belgaum

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

दि
युनायटेड कमर्शिअल बँक लि.
कलकत्ता.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ | कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ | कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ | कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ | लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
ओ. डी. विलों ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोयंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉं | महादेव एल. डहाणूकर |
| वैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २९ एप्रिल, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शांतता पाहिजे, पण हळूहळू

दीर्घ काल उपवास केलेल्या माणसाला एकदम खूप खाऊं घातलें तर त्याचा घातक परिणाम होतो. सध्यां जगाची शांततेबाबत अशीच परिस्थिति झाली आहे. गेलीं पांच वर्षें युद्धाच्या वातावरणाला अनुरूप अशी आर्थिक व्यवस्था सर्व जगांत आणि विशेषतः प. युरोप आणि अमेरिका ह्या देशांमधून उत्पन्न करण्यांत आली होती. युद्धविषयक उत्पादनकार्याला जुंपलेली ही अर्थव्यवस्था एकदम शांततेशीं जुळवून घेणार नाहीं. शांतता एकदम आल्यास ह्या अर्थव्यवस्थेची गुंतागुंतीची घडण एकाएकीं कोसळण्याचा धोका आहे व तशी ती कोसळल्यास त्याचे आर्थिक व सामाजिक परिणाम फारच गंभीर स्वरूपाचे होतील. कोरिआंत जखमी व आजारी युद्धकैद्यांचीं मुक्ततेचीं बोलणीं सुरू झाल्यापासून न्यूयॉर्क, लंडन व टोकिओ येथील शेअरबाजारांत खळबळ उडाली आहे. गेल्या दोन वर्षांत आली नव्हती इतकी विकणाऱ्यांची मोठी गर्दी शेअरबाजारांत झाली. अमेरिकेंत शस्त्रास्त्रांच्या व दारूगोळ्याच्या कारखान्यांच्या शेअर्सचे भाव एकदम बरेच गडगडले.

युद्धविषयक उत्पादन एकदम बंद करणें अर्थातच अशक्य आहे. सरकारांनीं ज्या मालाची मागणी नोंदलेली आहे ती मागणी पुरी करावीच लागेल. हळूहळू युद्धविषयक मालाचें उत्पादन बंद करून रोजच्या गरजा पुरविणाऱ्या वस्तू तयार कराव्या लागतील. जे कारखाने आज टँक्स आणि तोफा करीत आहेत, त्यांना मोटारी व घुण्याचीं यंत्रें तयार करण्यासाठी निराळीं यांत्रिक हत्यारें बसवावीं लागतील. शांतता स्थापन होण्याची शक्यता लोकांच्या मनांत जसजशी रुजूं लागेल तसतसे ते बचत कमी करूं लागतील. आज युद्धाच्या बाँडसवर उभारलेली मोठी रक्कम तर शस्त्रास्त्रांच्या उत्पादनांत गुंतविली जातेच; पण बँका, पोस्टऑफिसें, विमाकंपन्या ह्यांच्याकडील शिल्लक पैसाहि त्याच कामीं गुंतविला जातो. युद्धाच्या मालाच्या मागणीमुळें कारखान्यांना वाजवी किंमतीला माल विकला जाण्याचें एक प्रकारचें आश्वासनच मिळतें. पण उद्यां हेच कारखाने ग्राहकांना लागणाऱ्या वस्तू तयार करूं लागल्यास त्यांना बाजारपेठेची हमी मिळणार नाहीं. उदाहरणार्थ, ब्रिटनचा मोटारीचा धंदाच पाहा. आज अमेरिकन कारखानदार युद्धविषयक माल तयार करीत आहेत म्हणून ब्रिटनच्या मोटारी अमेरिकेंत खपत आहेत. त्याचप्रमाणें ब्रिटनमधील विजेचीं उपकरणें व घरकामाला लागणाऱ्या वस्तूहि अमेरिकेंत खपत आहेत. अमेरिकन कारखाने हाच अगर तत्सम माल निर्माण करूं लागल्यास ब्रिटनच्या मालाचा उठाव होणें कठीण होईल, हें उघडच आहे. प. युरोप आणि अमेरिका ह्यांच्या भांडवलप्रधान अर्थव्यवस्थेचा विचार करतां युद्धविषयक खर्च एकदम कमी करणें त्यांना अतिशय धोक्याचें आहे. खाजगी भांडवलदारांना ज्या अर्थव्यवस्थेंत मोक्याचें स्थान आहे, अशा कोणत्याहि अर्थव्यवस्थेला एकदम मोहरापालट करतां येत नाहीं. ह्याच्या उलट सोव्हिएट रशिआसारख्या केंद्रित अर्थव्यवस्था असलेल्या देशांची स्थिति असते. केवळ तात्त्विक दृष्ट्या विचार केला तर युद्धविषयक मालाऐवजीं उपभोग्य मालाची निर्मिति एकदम सुरू करणें रशिआला अधिक सुलभतेनें शक्य आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत तसें केलें जाईलच असें नाहीं; पण तुलनात्मक दृष्ट्या विचार करतां अमेरिका अगर ब्रिटनसारख्या देशांना मुलकी गरजा भागविणारी अर्थव्यवस्था एकदम चालू करणें जितकें लवकर शक्य आहे, त्यापेक्षा रशिआला तें अधिक जलदीनें करतां येण्यासारखें आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवली तर रशिआंत वस्तूंच्या किरकोळ विक्रीच्या किंमतींत युद्ध बंद झाल्यापासून जी सहावी कपात करण्यांत आली, ती सूचक आहे.

## नॉर्वेची भारताला मदत

भारताला तांत्रिक मदत देण्यासाठीं पैसे जमविण्याची एक मोहीम नॉर्वेमध्यें १५ एप्रिलपासून सुरू करण्यांत आली असून ती सर्व देशभर प्रसृत करण्यांत आली आहे. त्रावणकोर--कोचीनमधील एका जिल्ह्यांतील कोळी लोकांच्या जीवनाचें मान वाढविण्यासाठीं पैसे गोळा करण्याचा मोहिमेचा उद्देश आहे. नॉर्वेजिअन पार्लमेंटनें मोहिमेला मदत म्हणून ५,००,००० पौंड मंजूर केले आहेत आणि मोहिमेचे संघटक अशी अपेक्षा करीत आहेत कीं आणखी तितकीच रक्कम वर्गणीच्या रूपानें लोकांच्याकडून जमा होईल. मोहिमेची माहिती सर्व देशभर व्हावी म्हणून १,२०० कमिट्या स्थापन करण्यांत आल्या आहेत. मदतीच्या कार्यक्रमाची माहिती लोकांना देणें आणि वर्गणी जमा करणें हीं कामें वरील कमिट्या करणार आहेत. नॉर्वेमधील कारखान्यांच्या मालकांची संघटना आणि कामगार संघ ह्यांनीं मोहिमेला मदत करण्याचें आश्वासन दिलें आहे. नॉर्वेतील बरेच लोक आपलें एक दिवसाचें वेतन मदतीच्या कार्यक्रमाला वर्गणी म्हणून देतील अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. लोकांना माहिती व्हावी म्हणून १० लाख प्रचारपत्रिका काढण्यांत आल्या आहेत आणि ७०,००० भिंतीपत्रिका चिकटविण्यांत आल्या आहेत. त्याशिवाय इतराहि अनेक प्रकारचीं माहितीपत्रकें लोकांत वाटण्यांत येत आहेत. प्रचारासाठी चित्रपटांचाहि उपयोग करून घेण्यांत येत आहे. भारतासंबंधीं माहिती करून देणारीं अभ्यास मंडळेंहि स्थापन करण्यांत आलीं आहेत. व्याख्यानांच्या द्वाराहि भारतविषयक माहिती नॉर्वेजिअन जनतेंत प्रसृत करण्यांत येत आहे. नॉर्वे हें राष्ट्र मच्छिमारांच्या धंद्याविषयीं विशेष प्रसिद्ध असल्यामुळें त्याच धंद्यांतील भारतीयांना मदत करण्याची त्याची इच्छा असणें स्वाभाविक आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्राच्या इमारतीचें उद्घाटन

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. पुणें च्या मुख्य कचेरीच्या विश्रामबागवाड्यासमोरील इमारतीचें उद्घाटन रविवार ता. ३ मे १९५३ रोजीं सकाळीं ९ वाजतां डॉ. एम्. आर. जयकर ह्यांच्या हस्तें होणार आहे.

# BANK OF POONA LIMITED.

*Balance Sheet as at 31st December 1952.*

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital:** | | |
| **Authorised Capital** | | |
| 50,000 Shares of Rs. 100/- each ... | 50,00,000—0—0 | |
| **Issued Capital** | | |
| 25,000 Shares of Rs. 100/- each ... | 25,00,000—0—0 | |
| **Subscribed Capital** | | |
| 25,000 Shares of Rs. 100/- each ... | 25,00,000—0—0 | |
| Amount Called up at Rs. 50/-per share: | 12,50,000—0—0 | |
| Less calls unpaid ... | Nil | |
| Add forfeited shares ... | Nil | 12,50,000—0—0 |
| **2. Reserve Fund And Other Reserves** | | 17,000—0—0 |
| **3. Deposits And Other Accounts** | | |
| Fixed Deposits ... | 7,44,526—8—0 | |
| Savings Bank Deposits ... | 6,92,411—3—4 | |
| Current accounts and Contingency accounts etc., ... | 7,69,951—9—7 | 22,06,889—4—11 |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, Etc.** | | |
| (1) In India ... | Nil | |
| (2) Outside India ... | Nil | Nil |
| Particulars :— | | |
| (1) Secured ... | Nil | |
| (2) Unsecured ... | Nil | Nil |
| **5. Bills Payable** | | 957—0—0 |
| **6. Bills For Collection being Bills Receivable as per Contra** | | |
| (1) Payable in India ... | 80,433—4—1 | |
| (2) Payable Outside India ... | Nil | 80,433—4—1 |
| **7. Other Liabilities** | | |
| (1) Provision for Income-Tax ... | 2,183—2—0 | |
| (2) Branch adjustment ... | 1,837—3—0 | |
| (3) Rebate on Bills discounted ... | 82—3—0 | 4,102—8—0 |
| **8. Acceptances, Endorsements and Other Obligations, as per contra** ... | | Nil |
| **9. Profit And Loss Account** | | |
| Profit as per last Balance Sheet ... | 19,469—4—5 | |
| Less appropriations: ... | | |
| To Reserve Fund 5,000—0—0 | | |
| To Provision for Income-Tax 8,000—0—0 | 13,000—0—0 | |
| | 6,469—4—5 | |
| Add Profit for the year brought from the Profit and Loss. A/C., | 12,052—4—4 | 18,521—8—9 |
| **10. Contingent Liabilities** | Nil | |
| Total... Rs. | | 35,77,903—9—9 |

( See Profit and Loss Account on Page 134 )

# BANK OF POONA LIMITED.

*Balance Sheet as at 31st December 1952.*

## PROPERTIES AND ASSETS

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Cash :** | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank (Including foreign currency notes.) ... | | 4,02,641—1—6 |
| **2. Balances With Other Banks ( on Current account )** | | |
| (1) In India ... | 1,79,917-14—2 | |
| (2) Outside India ... | Nil | 1,79,917-14—2 |
| **3. Money At Call and Short Notice** | | Nil |
| **4. Investments ( at book value )** | | |
| (1) Securities of the Central and State Governments and other trustee securities including treasury bills of the Central and State Governments ( Market value Rs. 5,43,247-12-0. ) ... | 5,88,602—4—0 | |
| (2) Shares | | |
| Ordinary fully paid ... | 5,911—8—6 | |
| „ partly paid ... | Nil | |
| Deferred fully paid ... | Nil | |
| ( Market value Rs. 3,167-12-6. ) | | |
| (3) Debentures or Bonds ... | Nil | |
| (4) Other investments ... | Nil | |
| (5) Gold ... | Nil | 5,94,513-12—6 |
| ( Some of the Investments are lodged with other Banks for advance facilities ) ... | | |
| **5. Advances** | | |
| (Other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors. ) | | |
| (1) Loans, Cash Credits, Overdrafts etc. ... | | |
| (1) In India 21,94,373-3-9 | | |
| (2) Outside India nil | 21,94,373—3—9 | |
| (2) Bills discounted and purchased ( excluding treasury bills of the Central and State Governments) ... | | |
| (1) Payable in India 44,570-13-0 | | |
| (2) „ outside India nil | 44,570-13—0 | 22,38,944—0—9 |
| **Particulars Of Advances ( *See Page 134* )** | | |
| **6. Bill Receivable Being Bills for Collection as per contra** | | |
| (1) Payable in India ... | 80,433—4—1 | |
| (2) „ Outside India ... | Nil | 80,433—4—1 |
| **7. Constituents' Liabilities For Acceptances, Endorsements And Other Obligations per contra** | | Nil |
| **8. Premises Less Depreciation** | | Nil |
| **9. Furniture And Fixtures Less Depreciation** | | |
| At cost as per last Balance Sheet ... | 47,456—6—9 | |
| Additions during the year ... | 363—0—0 | |
| Less depreciation upto 31-12-51 Rs. 9,859-6-9 | 47,819—6—9 | |
| for the year 1,900-0-0 | 11,759—6—9 | 36,060—0—0 |
| **10. Other Assets Including Silver** | | |
| (1) Land at cost ... | 19,000—0—0 | |
| (2) Vehicles at cost 11,854-8-0 | | |
| less depreciation upto 31-12-52 4.634-8-0 | 7,200—0—0 | |
| (3) Stationery stock ... | 3,340—0—0 | |
| (4) Stamps ... | 310—1—9 | |
| (5) Interest accrued on investments ... | 5,675—5—0 | |
| (6) Tax deducted at source ... | 4,210—0—0 | |
| (7) Tax paid in advance ... | 5,250—0—0 | |
| (8) Prepaid expenses ... | 358-14—0 | |
| (9) Renters locks ... | 49—4—0 | 45,393—8—9 |
| **11. Non-Banking Assets Acquired In Satisfaction Of Claims** | | Nil |
| Total... Rs. | | 35,77,903—9—9 |

( See Profit and Loss Account on Page 134 )

# BANK OF POONA LIMITED.

## Particulars Of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1952 on page 133

| | Rs. As. Ps. |
|---|---|
| (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured... | 16,25,980—1—10 |
| (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the Debtors' personal security ... | 5,85,783—9—8 |
| (3) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties, in addition to the personal security of the Debtors. | Nil |
| (4) Debts considered doubtful or bad not provided for ... | 27,180—5—3 |
| | 22,38,944—0—9 |
| (5) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person ... | 3,33,641—10—) |
| (6) Debts Due by Companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of the private companies as Members ... | 3,40,550—7—10 |
| (7) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 3,37,698—3—9 |
| (8) Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of the private companies as members ... | 4,06,795—4—10 |
| (9) Due from Banking Companies ... | Nil |

## *Profit and Loss Account for the Year ended 31st December 1952.*

| Dr. EXPENDITURE | Amount | INCOME (Less provision made during the year for bad & doubtful debts & other usual or necessary provisions) Cr. | Amount |
|---|---|---|---|
| | Rs. As. Ps. | | Rs. As. Ps. |
| Interest paid on Deposits, borrowings etc. ... | 37,227—7—1 | Interest and Discount ... | 1,18,177—7—8 |
| Salaries and Allowances and Provident Fund ... (1) Manager 6,920—0—0; (2) Staff 39,600—9—3 | 46,520—9—3 | Commission, Exchange and brokerage ... | 6,789—7—0 |
| Directors' and Local Committee Members' fees and allowances ... | 2,250—0—0 | Rents ... | Nil |
| Rent, Taxes, Insurance, Lighting etc., ... | 8,224—6—6 | Net profit on sale of investment, gold, and silver, land, premises and other assets. (Not credited to Reserves or any particular fund or account) ... | 306—12—0 |
| Law Charges ... | 1,487—6—6 | | |
| Postages, Telegrams, and Stamps ... | 3,479—4—6 | | |
| Auditors' fees ... | 1,000—0—0 | Net profit on revaluation of investments gold and silver, land, premises and other assets. (Not credited to Reserves or any particular fund or account) ... | Nil |
| Depreciation on and repairs to the Banking Companies property | 3,702—0—0 | | |
| Stationery, Printing, Advertisement etc. ... | 6,337—5—9 | Income from Non-Banking assets and profit from sale of or dealing with such assets. ... | Nil |
| Loss from sale of or dealing with non-Banking assets ... | Nil | Other receipts ... | |
| Other Expenditure ... (Motor Car running and Maintenance, travelling and other miscellaneous expenses) ... | 8,860—9—0 | Law Charges recovered 2,949—12—10; Share Transfer fee, locker rent and other Miscellaneous receipts 2,917—13—5 | 5,867—10—3 |
| Balance of profit (Subject to taxation)... | 12,052—4—4 | | |
| Total...Rs. | 1,31,141—4—11 | Total...Rs | 1,31,141—4—11 |

M. C. Loya, *Chairman.*

N. B. Parulekar
F. P. Pocha,
D. R. Naik,
N. S. Somani,
G. K. Naik, } *Directors*

K. D. Joglekar, *Accountant.*

G. G. Sathe, *Manager.*

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the above balance sheet of Bank of Poona Ltd., as at 31st December 1952, and also the foregoing Profit and Loss account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the audited returns from Branches and report that :—

(*a*) We have obtained all the information and explanations we have required and have found them to be satisfactory. (*b*) The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank. (*c*) The returns received from the branch offices of the Bank have been found adequate for the purpose of the audit. (*d*) In our opinion the above Balance Sheet and Profit and Loss account are drawn up in conformity with the law. (*e*) Such Profit and Loss account shows a true balance of Profit for the year. (*f*) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of affairs of the Bank according to the best of our information and explanations given to us and as shown by the Books of the Bank and (*g*) In our opinion, books of account have been kept by the Bank as required by the Section 130, of the Indian Companies Act 1913.

Poona, 7th February 1953.

P. G. Bhagwat, *Chartered Accountants.*

(See Balance Sheet on Page 132 and 133)

## पुणें जिल्हा खरेदी–विक्री संघाच्या कोठाराचें उद्घाटन

### चेअरमन, श्री. खोले ह्यांचें भाषण

पुणें जिल्हा सहकारी खरेदीविक्री संघाच्या नवीन बांधलेल्या कोठाराचें उद्घाटन १८ एप्रिल, १९५३ रोजीं श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या हस्तें झालें. त्या वेळीं संघाचे चेअरमन, श्री. य. द. खोले ह्यांनीं त्यांच्या प्रास्ताविक भाषणांत प्रथम संघाच्या स्थापनेचा व प्रगतीचा इतिहास निवेदन केला. सहकारी खरेदीविक्री संघापुढील सध्याच्या अडचणींचा निर्देश करतांना त्यांनीं खालील गोष्टींच्या आवश्यकतेवर भर दिलाः—

(१) कर्ज व शेती मालाची विक्री यांची सांगड घालणें. (२) शेती मालासाठीं लागणारा कच्चा माल हमखास व किमान किंमतीमध्यें उपलब्ध होणें. (३) शेती मालाची किमान किंमत ठरविणें. (४) सरकारनें आपल्या सर्व योजना सहकारी खरेदीविक्री संघामार्फत करणें. (५) ठिकठिकाणीं कोठारें उपलब्ध करून शेतीमालासाठीं सांठा करून त्यांवर योग्य असा ॲडव्हान्स देण्याची व्यवस्था करणें.

संघानें गेलीं दोन वर्षें पुणें जिल्ह्यांतील बटाटा उत्पादनाच्या भागासाठीं सिमला येथील बटाटा–बियाणें पुरविण्याची व्यवस्था केली आहे. दुसरा उपक्रम म्हणजे जिल्ह्यांत शेतीस उपयुक्त अशी यांत्रिक साधनसामुग्री व त्यासाठीं तेलें वगैरे पुरविणें हा होय. शैक्षणिक व्यवहारास लागणारी साधनसामुग्री मोठ्या प्रमाणावर पुरविण्याचें काम संघानें नुकतेंच हातीं घेतलें आहे. त्यापूर्वीच्या व चालू सालच्या पुणें जिल्ह्यांतील दुष्काळ निवारणाचे कामीं संघानें मदत करण्याचें काम अंगावर घेतलें आहे. ह्या मदतीचा उल्लेख पुणें जिल्हा दुष्काळ निवारण समितीनें कृतज्ञतापूर्वक केला आहे.

शेतकऱ्यांप्रमाणें इतरहि उत्पादक–व्यावसायिकांच्या गरजा भागविण्याचा प्रयत्न चालू आहे आणि या दृष्टीनें दुग्धव्यवसायी लोकांसाठीं संस्थेकडून प्रयत्न चालू असून त्यांचेसाठीं जनावरांस लागणारी पेंड, गवत वगैरे पुरविण्याचें काम संस्थेनें आरंभापासून सुरू केलें आहे. नवीन सरकारी धोरण व कायदे हीं सरकारी प्रवृत्तीस व व्यवहारास पोषक अशींच रहातील, अशी आशा श्री. खोले ह्यांनीं व्यक्त केली.

### श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचें भाषण

कोठाराचें उद्घाटन करतांना श्री. वैकुंठराय मेहता म्हणाले, कीं, नियंत्रणाचें आधारावर ग्राहक-संस्था अगर खरेदीविक्री संस्था टिकतील ही कल्पना सोडून देऊन विनियंत्रणामुळें उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीचा आतापासूनच विचार करावयास पाहिजे. नियंत्रणाचे कामीं सरकारनें सहकारी संस्थांचा उपयोग करून घेतला तरीसुद्धां नेहमींच्या सामाजिक व्यवस्थेसाठीं ग्राहक-सहकारी संस्थांना मोठें स्थान आहे. आपल्या राज्यांत सहकारी खरेदी विक्री संघांचें काम सरकारी नियंत्रणापूर्वीपासूनें चांगलें चाललें आहे. नियोजन समितीचे मतें शेतकऱ्यांस उत्पादन पाठविणेसाठीं सहकारी संघटनेचा आधार घेऊन काम करणें योग्य होईल व ती कामगिरी यशस्वी करण्यास सहकारी कार्यकर्त्यांनीं आतापासून विचार करून कार्यास लागलें पाहिजे. आपल्या राज्यांत रेग्युलेटेड मार्केट कायदा लागू केला आहे परंतु त्यांची अंमलबजावणी फार थोड्या ठिकाणीं आहे. इतर ठिकाणीं तो लागू करण्यापूर्वी कायद्यांतील अडचणी काय आहेत त्या समजून घ्याव्यात हें योग्य होईल.

## दि रत्नाकर बँक लिमिटेड

### श्री. बी. बी. पाटील, चेअरमन, यांचें ९ व्या वार्षिक सभेच्या वेळचें भाषण.

१९५२ सालची सुरुवात मंदीनें व अस्थिरतेनें झाली. तरी अखेर स्थिरस्थावर स्वरूपाची झाली आहे. सारख्या वाढत जाणाऱ्या जीवनोपयोगी वस्तूंच्या किंमती १९५२ सालीं एकदांच्या खालीं आल्या. कापड, धान्य, अन्न, साखर, लोखंड, कोळसा, सिमेंट आणि इतर अनेक जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा वाढला. आर्थिक नियोजनाचे आराखडे तयार झाले व अशा प्रकारें परिस्थिति स्थिर मार्गावर आल्यानें आशादायक घटना घडतील असें वाटूं लागलें आहे.

१९५२ सालीं वस्तूंच्या किंमती जरी कमी आल्या तरी वस्तूंचें उत्पादन घटलें नाहीं किंवा त्यांचा पुरवठा कमी झाला नाहीं, ही विशेष उल्लेखनीय गोष्ट होय. औद्योगिक व शेतीपासून निर्माण होणाऱ्या मालाचें उत्पादन वाढलें. जागतिक युद्धाची भीति कमी झाल्यामुळें अधिक नफे मिळविण्यासाठीं जे भरमसाट सांठे तयार केले होते ते वितळूं लागले व त्यांचा पुरवठा सामान्य जनतेस अधिक होऊं लागला. त्याचप्रमाणें कच्च्या मालामध्यें जरी मंदी निर्माण झाली तरी औद्योगिक उत्पादन घटलें नाहीं. साखर व कापड या धंद्यांतील उत्पादन तर देशांतील आतांपर्यंतच्या इतिहासांत अधिक झालें.

जीवनोपयोगी वस्तूंच्या किंमतींचा सूचनांक १९५१ च्या डिसेंबरमध्यें ४३२·२ होता तो १९५२ च्या डिसेंबरमध्यें ३७४·५ वर आला. हा सूचनांक १९५३ जानेवारीमध्यें ३५१·६ झाला आहे. किंमती योग्य पातळीवर राहिल्यामुळें व पुरवठा अधिक वाढल्यामुळें कापड, अन्नधान्य व इतर कांहीं मालावरील नियंत्रणें देशांतील पुष्कळ विभागांतून शिथिल करणेंत आलीं आहेत. त्यामुळें एकंदर जनतेमध्यें समाधानाचें वातावरण पसरून खुल्या बाजारांत मागणी व पुरवठ्याप्रमाणें कापड व अन्नधान्याच्या किंमती राहूं लागल्या; व यामुळें खाजगी दडविलेले सांठे कमी होऊन त्यांचें पैशामध्यें रूपांतर होऊन तो पैसा निरनिराळ्या तऱ्हेनें उपयोगी होऊं लागला.

१९५१ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत रिझर्व्ह बँकेनें व्याजाचा दर वाढविल्यानंतर नाणे–बाजारांतील घटनांवर रिझर्व्ह बँकेचा योग्य तो ताबा राहूं शकला व त्यामुळें १९५२ सालच्या मोसमांत रिझर्व्ह बँक निरनिराळ्या तऱ्हेनें क्रेडिटचा पुरवठा करूं शकली. शेड्यूल्ड बँकांना सरकारी कर्जरोख्यांच्या तारणावर कर्जाऊ रकमा देणें, दहा कोटींपेक्षा अधिक खेळतें भांडवल ज्या बँकांचें आहे अशा मोठ्या बँकांना त्यांनीं घेतलेल्या मुदत-हुंड्यांच्या तारणावर रकमा कर्जाऊ देणें, सट्टा करणाऱ्या गिऱ्हाइकांना कर्जे देण्यावर नियंत्रण आणणें, वगैरे गोष्टींनीं क्रेडिटचा पुरवठा करून नाणेभीड कमी करण्याचा रिझर्व्ह बँकेनें प्रयत्न केला, व तो यशस्वीहि झाला.

१९५१ च्या मोसमांत जास्तींत जास्त कर्जे ५५४ कोटींचीं होतीं, तर १९५२ च्या मोसमांत तीं फक्त ४८५ कोटींच राहिलीं. त्याचप्रमाणें मध्यंतरीं बंद केलेली ट्रेझरी बिल्स रिझर्व्ह बँकेनें पुन्हां काढावयास सुरुवात करून थोड्या मुदतीची गुंतवणूक वाढविणेस मदत केली आहे.

वरील सर्व घटनांचा विचार करतां जी कांहीं स्थिर स्वरूपाची परिस्थिति सबंध देशभर एकंदरीनें निर्माण झाली तिचा परिणाम दक्षिण महाराष्ट्रांतील आपल्या विभागांत व तेथें असलेल्या आपल्या बँकेवरहि झालेला आपणांस दिसून येईल.

# THE BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

***Balance Sheet as at 31st December 1952***

**CAPITAL AND LIABILITIES**

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| **Authorised Capital** | | |
| 10,000 Shares of Rs. 50/- each | | 5,00,000—0—0 |
| **Issued Capital** | | |
| 10,000 Shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000—0—0 |
| **Subscribed Capital** | | |
| 10,000 Shares Rs. 50/- each ... | | 5,00,000—0—0 |
| Amount called up at Rs. 25/- per Share ... | | 2,50,000—0—0 |
| **2. Reserve Fund and Other Reserves** | | |
| Reserve Fund ... | 40,257—2—0 | |
| Investment Reserve Fund ... | 29,380—6—0 | |
| Investment Fluctuation Fund ... | 3,534—8—0 | |
| | | 73,172—0—0 |
| **3. Deposits and Other Accounts** | | |
| Fixed Deposits ... | 3,19,600—0—0 | |
| Savings Bank Deposits ... | 4,72,854—15—9 | |
| Current Accounts, Contingency Accounts, etc. ... | 3,23,070—11—7 | |
| | | 11,15,525—11—4 |
| **4. Borrowings From other Banking Companies, Agents, Etc.** | | |
| (i) In India ... | 2,94,275—3—3 | |
| (ii) Outside India ... | Nil | |
| | | 2,94,275—3—3 |
| Particulars | | |
| (i) Secured against Government Securities shown per contra. ... | 2,94,275—3—3 | |
| (ii) Unsecured ... | Nil | |
| **5. Bills Payable** | | Nil |
| **6. Bills for Collection being Bills Receivable as Per Contra** | | |
| (i) Payable in India ... | 2,293—5—9 | |
| (ii) Payable outside India ... | Nil | |
| | | 2,293—5—9 |
| **7. Other Liabilities** | | |
| (i) For Expenses ... | 450—0—0 | |
| (ii) Provident Fund partly invested as per contra ... | 6,657—2—8 | |
| (iii) Unpaid Dividends ... | 2,803—8—4 | |
| (iv) Branch Adjustments ... | 5,278—10—9 | |
| | | 15,189—5—9 |
| **8. Acceptances, Endorsements and Other Obligations per Contra** | | Nil |
| **9. Profit and Loss** | | |
| Profit as per last B/Sheet 7,495—0—3 ... | | |
| Less: Appropriations :— | | |
| Reserve fund 1,500—0—0 ... | | |
| Dividends 5,625—0—0 ... | | |
| Provision for Bonus to Staff 350—0—0 — 7,475—0—0 ... | 20—0—3 | |
| Add: Net profit for the year (subject to taxation) brought from the Profit & Loss Account ... | 7,143—12—11 | |
| | | 7,163—13—2 |
| **10. Contingent Liabilities** | | Nil |
| Total Rs. ... | | 17,57,619—7—3 |

( See Profit and Loss Account on Page 138 )

# THE BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

*Balance Sheet as at 31st December 1952*

PROPERTY AND ASSETS

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Cash** | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank (including Foreign Currency Notes) ... | | 1,57,930-10-11 |
| **2. Balances with other Banks** | | |
| (in current accounts) ... | | |
| (i) In India ... | 12,623—4—3 | |
| (ii) Outside India ... | Nil | 12,623—4—3 |
| **3. Money at Call and Short Notice** | | Nil |
| **4. Investments at Cost** | | |
| (i) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments. ... | 8,71,016—4—0 | |
| (Of these, Securities of the face value of Rs. 6,200/- are earmarked for Providend Fund as per contra. Average Market Value Rs. 8,04,966-12-0. Some of these Securities of the face value of Rs. 6,50,000/- are lodged with Banking Companies for overdraft arrangement.) | | |
| (ii) Shares ... | | |
| Ordinary Shares fully paid of the face value of Rs. 100/- (Market Price Rs. 145/-) ... | 145—0—0 | |
| (iii) Debentures or Bonds ... | Nil | |
| (iv) Other Investments ... | Nil | |
| (v) Gold ... | Nil | 8,71,161—4—0 |
| **5. Advances** | | |
| (Other than Bad and Doubtful Debts for which Provision has been made to the satisfaction of the Auditors) ... | | |
| (i) Loans, Cash Credits, Overdrafts, etc. ... | | |
| (i) In India ... | 6,69,411-14-11 | |
| (ii) Outside India | Nil | |
| (ii) Bills Discounted and Purchased, (excluding Treasury Bills of the Central & State Governments) ... | | |
| (i) Payable in India ... | Nil | |
| (ii) Payable outside India ... | Nil | 6,69,411-14-11 |
| Particulars of Advances (*See Page 138*) | | |
| **6. Bills Receivable being Bills for Collection as per Contra** | | |
| (i) Payable in India ... | 2,293—5—9 | |
| (ii) Payable outside India ... | Nil | 2,293—5—9 |
| **7. Constituent's Liabilities For Acceptances, Endorsements and Other Obligations, Per Contra** | | Nil |
| **8. Premises Less Depreciation** | | Nil |
| **9. Furniture and Fixtures at Cost** | 22,963-12—9 | |
| Additions ... | 97-13—0 | |
| | 23,061—9—9 | |
| Less Depreciation ... | 9,990-12—0 | |
| | | 13,070-13—9 |
| **10. Other Assets, Including Silver.** | | |
| (i) Interest on Investments accruing but not due and interest outstanding ... | 7,177—5—8 | |
| (ii) Income Tax paid at source ... | 12,358-11—0 | |
| (iii) Sundry Debtors (10,000/- being considered doubtful) ... | 11,592—1—0 | 31,128—1—8 |
| **11. Non Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** | | Nil |
| **12. Profit and Loss Account** | | Nil |
| **Total Rs....** | | 17,57,619—7—3 |

(See Profit and Loss Account on Page 138)

# THE BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1952 on page 137**

| | Rs. As. Ps. |
|---|---|
| (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 3,58,272—7—4 |
| (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 3,11,139—7—7 |
| (3) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the Debtors ... | Nil |
| (4) Debts considered doubtful or bad, not provided for. ... | Nil |
| | 6,69,411-14-11 |
| (5) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person ... | Nil |
| (6) Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as directors, partners or managing agents, or, in the case of private companies as members ... | 3,807—6—0 |
| (7) Maximum total amount of advance, including temporary advance made at any time during the year to Directors or managers or officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person ... | Nil |
| (8) Maximum total amount of advance, including temporary advance granted during the year to the Companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as directors, partners or managing agents or in the case of private companies as members ... | 6,113—1—0 |
| (9) Due from Banking Companies ... | Nil |

***Profit and Loss Account for the Year ended 31st December 1952***

| EXPENDITURE | Rs. As.Ps. | INCOME | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 1. Interest paid on Deposits, borrowings etc. ... | 30,481—1—0 | (Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary provisions) ... | |
| 2. Salaries and allowances and Provident Fund ; Manager & Chief Executive Officer 3,225-15—0; Others 17,890—0—7 | 21,115-15—7 | 1. Interest and Discount ... | 68,121-12—7 |
| | | 2. Commission, exchange and Brokerage | 1,793—7—2 |
| 3. Directors' & Local Committee Members' fees and allowances ... | 1,593—9—0 | 3. Rents ... | Nil |
| 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | 4,082—1—6 | 4. Net Profit on sale of Investments, gold and silver, land and premises and other assets (not credited to Reserves or any particular fund or account) ... | Nil |
| 5. Law Charges ... | 219—7—3 | | |
| 6. Postage, Telegrams & Stamps ... | 840—4—3 | 5. Net profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserves or any particular fund or account) ... | Nil |
| 7. Auditors' Fees ... | 350—0—0 | | |
| 8. Depreciation on and repairs to the Banking Company's Property ... | 1,417—0—0 | | |
| 9. Stationery, Printing, Advertisement etc. ... | 1,689—7—4 | 6. Income from Non-Banking assets & Profit from sale of or dealing with such assets ... | Nil |
| 10. Loss from sale of or dealing with non-banking assets. ... | Nil. | 7. Other Receipts ... | |
| 11. Other Expenditure; Sundry Charges 766—2—3; Travelling & Conveyance 705—3-11 | 1,471—6—2 | Share Transfer Fees and splitting charges 257-13—3; Safe Custody Charges. 231—0—0 | 488-13—3 |
| 12. Balance of Profit (Subject to Taxation) carried to Balance Sheet ... | 7,143-12-11 | | |
| Total Rs. ... | 70,404—1—0 | Total Rs. ... | 70,404—1—0 |

N. V. Pandav, Manager, Bhor,
Y. S. Joshi, *Asstt. Manager*
M. V. Shingre, *Chairman*

N. P. Thopte (*Vice-Chairman*)
K. V. Kelkar
Y. D. Khole
B. G. Dhanduke
} *Directors*

3rd March, 1953.

Shri. C. R. Rathi being out of Bhor has not Signed.

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the above Balance Sheet of the Bhor State Bank Ltd. Bhor, as at 31st December, 1952 and also the above Profit & Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the certified returns of the Branches and report that:

(*a*) We have obtained all the information and explanations we have required. (*b*) In our opinion, the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law; (*c*) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the State of the Bank's affairs according to the best of our information and the explanations given to us and as shown by the Books of the Bank; and (*d*) in our opinion, Books of Account have been kept by the Bank as required by Section 130 of the Indian Companies Act.

We have to report further that; (*e*) The information and explanations required by us have been found to be satisfactory; (*f*) The transactions of the Bank which have come to our notice, in our opinion, have been within the powers of the Bank; (*g*) The returns received from the Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of this audit; (*h*) The Profit and Loss Account, in our opinion, shows a true balance of profit for the period covered by such account.

Poona.
23rd February, 1953.

GADRE and BHIDE
*Chartered Accountants.*

(See Balance Sheet on Page 136 and 137)

## बँकांच्या नोकरवर्गाचे पगार व भत्ते

### शास्त्री ट्रायब्यूनलचा अवार्ड

सुप्रीम कोर्टानें सेन अवार्ड बिगर-कायदा ठरविल्यानंतर जानेवारी, १९५२ मध्यें श्री. पंचपकेश शास्त्री ह्यांच्या अध्यक्षत्वाखालीं सरकारनें दुसरें इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल नेमलें. त्यांत मुंबईचे प्रो. एम. एल. टंडण व म्हैसूरचे प्रो. व्ही. एल. डिसूझा हे दोघे समासद होते. ट्रायब्यूनलनें बँकांचें त्यांच्या व्यवहाराच्या आकाराप्रमाणें व रहाणीच्या खर्चाच्या प्रमाणानुसार क्षेत्राप्रमाणें वर्गीकरण करून त्याप्रमाणें पगार, भत्ता, इत्यादि ठरवून दिले आहेत. त्याचा सारांश खाली दिला आहे. ह्या अवार्डनें बँकांच्या नोकरवर्गाचें समाधान झालेलें नाहीं, आणि पगार-भत्त्याचा प्रश्न कायमचा सुटला व बँक नोकरांचा असंतोष टळला असें म्हणतां येणार नाहीं.

### खेळत्या भांडवलाचे अनुसार बँकांचें वर्गीकरण

खेळतें भांडवल म्हणजे वसूल भांडवल, अधिक रिझर्व्हज्, अधिक ठेवींची संबंद्ध वर्षांतील सरासरी रक्कम.

अ वर्गांतील बँका (२५ कोटी रु. पेक्षा ज्यास्त खेळत्या भांडवलाच्या) इंपीरिअल, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ बरोडा, युनायटेड कमर्शिअल बँक आणि अलाहाबाद बँक.

ब वर्गांतील बँका (७१/२ ते २५ कोटी रु. खेळत्या भांडवलाच्या) इंडियन बँक, हैद्राबाद स्टेट बँक, बँक ऑफ म्हैसूर, बँक ऑफ बिकानेर, इंडियन ओव्हरसीज बँक, देवकरण नानजी बँकिंग कंपनी आणि कॅनरा बँक.

क वर्गांतील बँका (१ ते ७१/२ कोटी रु. खेळत्या भांडवलाच्या)

ड वर्गांतील बँका (१ कोटी रु. पेक्षा कमी खेळत्या भांडवलाच्या)

### क्षेत्रानुसार बँकांचें वर्गीकरण

क्षेत्र १ कलकत्ता, मुंबई, मद्रास, दिल्ली व अहमदाबाद.

क्षेत्र २ एक लक्षापेक्षा अधिक लोकसंख्येचीं गांवें (वरील पांच वगळून).

क्षेत्र ३ इतर सर्व गांवें.

### कोणास किती रुपये पगार मिळेल

| | अ बँक | ब बँक | क बँक | ड बँक |
|---|---|---|---|---|
| क्षेत्र १ | ८५ते२८० | ७३ते२४५ | ६६ते२२७ | ५७ते२०० |
| क्षेत्र २ | ७३ते२४५ | ५७ते२०० | ५७ते२०० | ५४ते१९१ |
| क्षेत्र ३ | ६६ते२६७ | ५७ते२०० | ५४ते१९१ | ५१ते१८२ |

वेगवेगळ्या बँकांतील नोकरवर्गाचा किमान व कमाल पगार फक्त एकसारखा नसेल; क्षेत्र १ व क्षेत्र २ मधील बँकांतील नोकरांच्या पगारास प्रारंभापासूनच कांहीं वाढ मिळेल आणि त्यांचा कमाल पगारहि जास्त असेल. बँकांचा आकार मोठा त्याप्रमाणें पगार जास्त. पगाराची श्रेणी मात्र एकच : ५१ – ३ – ६९ – ४ – ८५ – ५ – १०० – ६ – ११२ – ७ – १४० – ८ – १६४ – ९ – २४५ – १० – २६५ – १५ – २८० ह्या श्रेणींत सर्व बँकांचे नोकर, कोष्टकांतील वर्गीकरणानुसार, बसतील.

पदवीधर, इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सची परीक्षा पास झालेले, ह्यांना पगारवाढीचे कांहीं टप्पे अगोदरच मिळतील.

ज्या क्षेत्रांत कमी पगाराचें स्केल लागू आहे तेथें नोकराची बदली झाली, तर त्याचा मूळ पगार कमी होणार नाहीं. ज्यास्त पगाराच्या स्केलचे जागीं त्याची बदली झाली तर त्यास ज्यास्त पगार मिळेल. कमी पगाराच्या क्षेत्रांत पुनः बदली झाली कीं, कमी स्केलचा पगार मिळेल. (त्यानें वरिष्ठ क्षेत्रांत १ वर्षापेक्षा कमी काळ काम केलें असेल तर). कोणतीहि बँक अवार्डपेक्षा ज्यास्त पगार किंवा पगारवाढ देऊं शकेल.

### महागाई भत्ता

सर्व बँकांत नोकरांना मूळ पगाराच्या ३३१/३% महागाई भत्ता मिळेल. क्षेत्रानुसार कमाल व किमान भत्ता खालीलप्रमाणें राहील:–

| क्षेत्र | किमान भत्ता | कमाल भत्ता |
|---|---|---|
| १ | ३५ | ७० |
| २ | ३० | ६० |
| ३ | २५ | ४० |

### घरभाडें

| | पगार १०० रु. | पगार १०१ ते २०० रु. | पगार २०० रु. वर |
|---|---|---|---|
| मुंबई व कलकत्ता | ८ रु. | १२ रु. | १६ रु. |
| ७ लाखांपेक्षा ज्यास्त लोकवस्तीचीं इतर शहरें | ६ रु. | ९ रु. | १२ रु. |

### कामाचे तास

| | |
|---|---|
| मधली सुट्टी सोडून शनिवारीं | ४ तास |
| ” ” इतर दिवशीं | ६१/२ तास |

### जादा काम

वर्षातून ९० तासांपेक्षा ज्यास्त जादा काम करावें लागणार नाहीं. पहिल्या अर्धा तास जादा कामास वेगळें वेतन मिळणार नाहीं. त्यानंतरच्या प्रत्येक पुऱ्या १५ मिनिटांस ट्रायब्यूनलनें ठरविलेल्या दरानें जादा वेतन मिळेल. हिशेब पुरे करण्यासाठी बँकांना सुट्टी जाहीर झाली असेल त्या दिवशीं इतर नेहमींच्या दिवसांच्या कामापेक्षा जास्त काम पडलें, तरच जादा वेतन मिळेल.

### बोनस

बोनस किती द्यावा, हें ट्रायब्यूनलनें सांगितलें नाहीं. परंतु बोनसला पात्र होण्यास किमान नोकरीची अट नसावी, एकूण वेतनावर तो आधारलेला असावा, डिव्हिडंड जाहीर केल्यावर दोन महिन्यांत तो दिला जावा, शिक्षा म्हणून कोणाचाहि बोनस रद्द करूं नये, असा ट्रायब्यूनलचा आदेश आहे.

### प्रॉव्हिडंट फंड

सर्व बँकांना प्रॉव्हिडंट सुरू करावा लागेल. पगाराच्या (भत्त्यासकट) ८१/३% इतकी रक्कम अ आणि ब वर्गांतील बँकांसाठी नेमून दिली आहे; क आणि ड वर्गांतील बँकांसाठी ती ६१/४% आहे.

### रजा

एक वर्षाच्या पुऱ्या नोकरीनंतर एक महिना हक्काची रजा अ आणि ब बँकांतून मिळेल; क आणि ड बँकांतून ती ३/४ महिना मिळेल.

### निवाडा कोणास लागू आहे?

सेन अवार्ड ज्या सुमारें २०० बँकांना लागू होता, त्याच बँकांना शास्त्री अवार्ड लागू आहे. म्हणजे, १३ जून १९४९ व २८ सप्टेंबर १९४९ ह्या दिवशीं ज्या बँकांच्या शाखा एकापेक्षा ज्यास्त प्रांतांत होत्या, अशांनाच तो लागू आहे. महाराष्ट्रीय बँकांपुरतें पाहिलें, तर बँक ऑफ महाराष्ट्र व न्यू सिटिझन बँक ह्यांवरच फक्त निवाडा बंधनकारक होईल. बाकीच्या बँकांवर निवाड्याप्रमाणें पगार, भत्ते, इत्यादि देण्याची जबाबदारी पडणार नाहीं.

**रेडिओ सीलोनवरील वेळेचें भाडें**—रेडिओ सिलोनवरील वेळ भाड्यानें घेतलेल्या हिंदी फर्म्सनीं १९५१ मध्यें सिलोनला ९,५२,००० रु. पाठविले. ह्याच मुदतींत विदेशी फर्म्सना अशाच भाड्यासाठीं भारतांतून २,६७,००० रु. पाठविण्यास रिझर्व्ह बँकेनें परवानगी दिली.

**पाकिस्तानी तांदूळ मिळविण्याची खटपट**—जपानी शेतीचीं अवजारें व खतें ह्यांच्या मोबदल्यांत पाकिस्तानी तांदूळ मिळ विण्याची खटपट एक जपानी शिष्टमंडळ पाकिस्तानांत करीत आहे.

**मजुरांच्या सोसायट्यांना सरकारी काम**—सेंट्रल पब्लिक वर्क्स खात्याची २,५०० रुपयांखालील किरकोळ कंत्राटें, टेंडरें न मागवितां, खात्यास मान्य असलेल्या मजुरांच्या सहकारी सोसायट्यांना देण्याचें आतां ठरलें आहे. ज्या विभागांत काम असेल, तेथें प्रचलित असलेल्या दरानें कंत्राट दिलें जाईल. मुंबई राज्याचें पब्लिक वर्क्स खातें २०,००० रु. पर्यंतचीं कामें ह्या पद्धतीनें आजाहि देत आहे.


**साखरेचें उत्पादन घटलें**— १९५२–५३ (नोव्हेंबर ते ऑक्टोबर) च्या हंगामांत भारतांत साखरेचें एकूण उत्पादन अंदाजें १२·९७ लक्ष टन झालें असावें; मागील हंगामांतील प्रत्यक्ष उत्पादन १४·८ लक्ष टन होतें. १९५२–५३ च्या हंगामांत गाळणीसाठीं एकूण ऊंस अंदाजें १३० लक्ष टन होता; १९५१–५२ च्या हंगामांत तो १५५ लक्ष टन होता. १९५१-५२ च्या हंगामाशीं तुलना करतां अखिल भारतांतील उत्पादनांत घट सुमारें १२ ते १५ टक्के होईल. १९५१–५२ च्या हंगामांत साखरेचा उतारा ९·५७ टक्के पडला होता. त्या ऐवजीं तो आतां १०·०१ टक्के आहे. भारतांतील एकूण १५७ कारखान्यांपैकीं १३४ कारखाने चालू हंगामांत काम करीत आहेत. गेल्या हंगामांत ही संख्या १३९ होती. १९५१–५२ चा हंगाम १३३ दिवसांचा होता, यंदाचा अखिल भारतीय हंगाम अंदाजें ११२ दिवस चालेल.

**चिनी बँकांतील मुक्तिपूर्व काळांतील ठेवींची परतफेड**—मध्यवर्ती चिनी लोकसत्ताक सरकारनें २० फेब्रुवारी, १९५३ रोजीं एक हुकूम काढून सबंध चीनमधील बँका आणि पैशाची देवघेव करणाऱ्या पेढ्या यांना मुक्तिपूर्व काळांतील परत न केलेल्या सर्व ठेवींची परतफेड त्यासाठीं ठरविलेल्या पद्धतीनुसार करण्यास फर्मावल्याचें भारत सरकारला कळविण्यांत आलें आहे.


किर्लोस्कर



हात पंप



उन्हाळी पिकासाठीं व घरगुती पाणी पुरवठ्यासाठीं खात्रीची उपाय योजना.

सेंट्रिफ्युगल पंप

विशेष माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी द. सातारा

—: महाराष्ट्राची अग्रेसर कंपनी :—

दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि.

पहिल्याच मूल्यमापनांत बोनस जाहीर करून, कंपनीनें असाधारण विक्रम करून दाखविला आहे. दुसऱ्या मूल्यमापनाचें काम चालू झालें असून, त्यांत निश्चित प्रगति दिसेल अशी खात्री वाटते.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.